# महाराष्ट्र शासन

(स्थापित)

## औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ,शाखा कार्यालय, जालना, औरंगाबाद

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ अंतर्गत कलम ६ (१) अन्वये स्थापीत कार्यालय - व्दारा, कामगार उपआयुक्त यांचे कार्यालय, विकास भवन, चौथा मजला, डॉ. राजेंद्र प्रसाद मार्ग, बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड, औरंगाबाद ४३१००१ दुरध्वनी – ०२४० -२३२२३०९.

जावक क्रमांक : १०२ /२०२२

दिनांक :- ०३/०२/२०२२

### आदेश

विषय :- औरंगाबाद जिल्हयातील व शाखा कार्यालय जालना जिल्हयातील सुरक्षा रक्षकांचे वेतनामधील महागाई भत्ता व तद्अनुषांगीक भत्या मध्ये सुधारणा करणे बाबत...

महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक एसजीए /१४२००२/९१५/ कामगार -५, दिनांक १२ नाव्हेंबर २००२ अन्वये औरंगाबाद जिल्हयासाठी महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ व २००५ लागु केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्रमांक युडब्ल्युए २०१३/ प्र.क्र.२३२/ कामगार-५, दिनांक १८ जून २०१३ अन्वये औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक एक सदस्यीय मंडळ स्थापन केलेले आहे.

तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक ०५/०६/२००९ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचने नुसार जालना जिल्हयासाठी औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ लागू केलेले आहे.

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ च्या कलम ६ नुसार एक सदस्यीय मंडळाच्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ च्या कलम ०३ (२) (५) अन्वये महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ व २००५ च्या खंड ३० अन्वये मंडळाने दिनांक १८/०९/२०१९ रोजीच्या एकसदस्यीय मंडळाच्या ठरावानूसार सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चिती करण्यात आलेले असून दिनांक ११/०२/२०२० रोजी जाहीर करण्यात आलेले आहे.

मा.कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे दिनांक ०१/०२/२०२२ च्या परिपत्रकानुसार औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ व शाखा कार्यालय जालना जिल्हयातील नोंदीत सुरक्षा रक्षकांचे विशेष भत्याचे (महागाई भत्ता) दर व घरभाडे दर दिनांक ०१ जानेवारी २०२२ पासून पुढील आदेशा पर्यंत खालील प्रमाणे वेतनामध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | मुळ वेतन रक्कम रूपये दिनांक १/८/२०१९ पासून | विशेष भत्ता रक्कम रूपये दिनांक १/१/२०२२ पासून | (मुळ वेतन+ विशेष भत्ता) घरभाडे ५% दिनांक १/१/२०२२ पासून | वाहन भत्ता रक्कम रूपये दिनांक १/८/२०१९ पासून | शैक्षणिक भत्ता रक्कम रूपये दिनांक १/८/२०१९ पासून | धुलाई भत्ता रक्कम रूपये दिनांक १/८/२०१९ पासून | एकुण रक्कम रूपये | लेव्ही (मुळ वेतन व विशेष भत्यावर) ४०.५०% लेव्ही | घरभाडे भत्ता, वाहन भत्ता, शैक्षणिक भत्ता व अतिरीक्त कामकाजावर १.२५% लेव्ही | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सुरक्षा रक्षक | ११८४५ | १७९४ | ६८२ | ६०० | ५०० | ६०० | १६०२१ | ५५२४ | ५८ | २१६०३ |
| ०२ | सुरक्षा पर्यवेक्षक | १२४५८ | १७९४ | ७१३ | ६०० | ५०० | ६०० | १६६६५ | ५७७२ | ५४ | २२४९१ |
| ०३ | सुरक्षा अधिकारी | १३०८४ | १७९४ | ७४४ | ६०० | ५०० | ६०० | १७३२२ | ६०२६ | ६० | २३४०८ |

१. शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई अधिसूचना दिनांक २० जुलै २००४ व शुध्दीपत्रक अधिसूचना दिनांक १८ ऑगस्ट २००४ व दिनांक २८/०९/२०१० तसेच शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई अधिसूचना दिनांक ०४ फेब्रुवारी २०१३ च्या अधिन राहुन औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या व शाखा कार्यालय जालना येथील सुरक्षा रक्षकांचे उपरोक्त प्रमाणे किमान वेतन जाहीर करण्यात येत आहे.

२. मंडळाने सुरक्षा रक्षकांसाठी उपरोक्त प्रमाणे निश्चित केलेले वेतनाचे दर दिनांक ०१ जानेवारी २०२२ पासून पुढील आदेशा पर्यंत अंमलात राहतील.

३. मंडळाच्या दिनांक १८/०९/२०१९ रोजी एकसदस्यीय मंडळाच्या ठरावानूसार तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक २४/०७/२०१९ रोजीचे अधिसूचने नुसार किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत दुकाने व आस्थापाना उद्योगातील कामगारांना लागु असलेला महागाई भत्ता मूळ वेतनात दिनांक ११/०२/२०२० रोजी समाविष्ट करण्यात येऊन औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, व शाखा कार्यालय जालना येथील सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्यात आलेले आहे.

४. शासनाने उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई अधिसूचना दिनांक २० जुलै २००४ व शुध्दीपत्रक अधिसूचना दिनांक १८ ऑगस्ट २००४ च्या अधिसूचने अन्वये कामगार आयुक्त कार्यालय, मुंबई यांचे दिनांक **०१/०२/२०२२** च्या परिपत्रकानुसार किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योगातील कामगारांकरीता दिनांक ०१/०१/२०२२ पासून विशेष भत्ता (महागाई भत्ता) रक्कम रूपये **१,७९४/-** उपरोक्त वेतनामध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

५. उपरोक्त वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीचा समावेश असेल. दररोज आठ तासाच्या कामाच्या एका पाळी करीता महिण्यातील २६ दिवसाकरीता लागु आहेत. दैनंदिन वेतनात मुळ वेतन, विशेष भत्ता (महागाई भत्ता) व इतर भत्ते मिळुन येणा-या एकुण वेतनास २६ ने भागून येणारा भागाकार पूर्णांकांत करून एक दिवसाचे वेतन काढण्यात येईल. (तसेच फेब्रुवारी महिन्यासाठी उपरोक्त वेतन हे २४ दिवसाकरीता लागू असून वेतनास २४ ने भागावे)

६. सुरक्षा रक्षकांनी केलेल्या अतिरीक्त कामाचे (Over Time) दर हे मुळ वेतन अधिक विशेष भत्ता मिळून येणा-या एकुण रक्कमेस २६ ने भागुन येणारा भागाकार पुर्णांकांत करुन एक दिवसाचे वेतन काढण्यात यावे. तसेच फेब्रुवारी महिण्यासाठी मुळ वेतन +विशेष भत्ता येणा-या एकुण रक्कमेस २४ ने भागुन येणारा भागाकार पुर्णांकांत करुन एक दिवसाचे वेतन काढण्यात यावे.व सदर रक्कमेच्या दुप्पट वेतन अतिरिक्त कामकाजासाठी देणे बंधनकारक राहील.

७. उपरोक्त किमान वेतनावर (मुळ वेतन + विशेष भत्ता ( महागाई भत्ता) = मुळ वेतन) ४०.५०% दराने लेव्ही देणे तसेच घरभाडे भत्ता,प्रवास भत्ता,शैक्षणिक भत्ता व अतिरीक्त कामकाजावर (ओ.टी.वर) ३.२५% दराने लेव्ही देणे मुख्य मालकास /नियोक्त्यास सुरक्षा रक्षका करता उपरोक्त अधिनियम व योजनेतील तरतुदीनूसार देणे बधंनकारक राहील.

८. नोंदीत मुख्य मालकांनी त्यांच्याकडे नोंदीत तैनात असलेल्या सर्व वर्गवारीच्या सुरक्षा रक्षकांचे देय वेतन व लेव्हीची रक्कम दरमहा ०५ तारखेपर्यंत धनादेशाव्दारे/आरटीजीएसव्दारे मंडळाच्या कार्यालयात जमा करणे मुख्य मालकावर बंधनकारक राहील.

अन्यथा महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नौकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व २००५ व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक(नोकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ व २००५ च्या तरतुदीनूसार कारवाई करण्यात येईल.

(चं.अं. राऊत)
कामगार उपआयुक्त तथा अध्यक्ष,
औरंगाबाद जिल्हा सुरक्षा रक्षक एकसदस्यीय मंडळ,
शाखा कार्यालय, जालना, औरंगाबाद

प्रति